



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता


Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25










# कत्तलखान्यांवर पालिकेचा हातोडा

## सात अनधिकृत कत्तलखाने जमीनदोस्त




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील वाढत्या अनधिकृत कत्तलखान्यांवर अखेर संगमनेर नगरपालिकेने आणि शहर पोलिसांनी मोठी संयुक्त कारवाई करत सात बेकायदेशीर कत्तलखाने जमीनदोस्त केले. मंगळवारी (दि. २) सकाळी ११ वाजता सुरू झालेली ही मोहीम दुपारी तीन वाजेपर्यंत सुरू होती. या कारवाईमुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या अतिक्रमणांवर पालिकेने थेट हातोडा चालवला असून परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

शहरातील जमजम कॉलनी, कादरी नगर, उम्मत नगर, जोर्वे परिसर तसेच पुणे नाका भागात अनेक ठिकाणी अनधिकृतपणे कत्तलखाने सुरू असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे वारंवार येत होत्या. यापैकी अनेक ठिकाणी शासकीय व सार्वजनिक जागांवर अतिक्रमण करून बांधकामे करण्यात आली होती. याबाबत नगरपालिकेने संबंधितांना पूर्वसूचना व नोटिसा बजावल्या होत्या. मात्र नोटिसांकडे दुर्लक्ष करून अतिक्रमणे कायम ठेवण्यात आल्याने प्रशासनाने कठोर भूमिका घेत संयुक्त कारवाईचा निर्णय घेतला.

मुख्याधिकारी दयानंद गोरे आणि पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली. कारवाईदरम्यान काही कत्तलखाना चालकांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला.

मात्र पोलिस प्रशासनाने तत्परतेने परिस्थिती नियंत्रणात ठेवत कारवाई निर्विघ्नपणे पार पाडली. नगरपालिकेचे जेसीबी, दोन ट्रॅक्टर आणि इतर यंत्रसामग्रीच्या सहाय्याने अनधिकृत बांधकामे पाडण्यात आली. अतिक्रमण विभागाच्या पथकाने प्रत्येक ठिकाणी पाहणी करून संबंधित बांधकामे हटवली. त्यामुळे अनेक भागांतील रस्ते, मोकळ्या जागा आणि सार्वजनिक क्षेत्र अतिक्रमणमुक्त झाले. (पान ३)

# वेदांत वाईन्स अडचणीत; गर्दी, अन् वाहतूक कोंडी

## खुलासा न केल्यास ५० हजारांचा दंड; परवाना रद्दचाही इशारा



**महामार्गावरील वाहतूक सुरळीत राहणे आणि शहर स्वच्छ ठेवणे ही केवळ प्रशासनाची नव्हे तर प्रत्येक व्यावसायिकाची सामूहिक जबाबदारी आहे. सार्वजनिक हिताला बाधा आणणाऱ्या कोणत्याही प्रकाराला नगरपरिषद पाठीशी घालणार नाही. नागरिकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित केले जाईल.**

**– दयानंद गोरे, मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद**



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या वेदांत वाईन्ससमोर ग्राहकांच्या वाहनांची बेशिस्त पार्किंग, वाहतुकीस होणारा अडथळा आणि परिसरात निर्माण होणारी अस्वच्छता याबाबत गंभीर दखल घेत संगमनेर नगरपरिषदेने संबंधित व्यवस्थापनाला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली.

नगरपरिषदेकडे प्राप्त झालेल्या तक्रारी तसेच प्रशासनाच्या पाहणीत असे आढळून आले की, सायंकाळच्या वेळेत वेदांत वाईन्ससमोर मोठ्या प्रमाणात ग्राहकांची गर्दी होत असून अनेक वाहने रस्त्यालगत आणि काही वेळा रस्त्यावरच उभी केली जातात. त्यामुळे पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतुकीचा वेग मंदावत असून नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या परिसरातून दररोज मोठ्या प्रमाणात वाहने ये-जा करत असल्याने अपघाताचा धोका वाढण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

याशिवाय, वाईन्स दुकानासमोर होणाऱ्या गर्दीमुळे परिसरातील शिस्त बिघडत असल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. काही नागरिकांनी मद्यप्राशन केलेल्या व्यक्तींमुळे सार्वजनिक ठिकाणी गैरसोयीचे वातावरण निर्माण होत असल्याची बाब नगरपरिषदेच्या निदर्शनास आणून दिली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित व्यवस्थापनाला गर्दी नियंत्रणासाठी आवश्यक मनुष्यबळ नियुक्त करणे, वाहनतळाचे योग्य नियोजन करणे आणि ग्राहकांकडून होणारी वाहतूक कोंडी रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा नगरपरिषदेच्या घंटागाडीत न देता सार्वजनिक ठिकाणी टाकला जात असल्याचेही प्रशासनाच्या पाहणीत आढळून आले आहे. त्यामुळे परिसरात अस्वच्छता, दुर्गंधी आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित समस्या निर्माण होत असल्याची नोंद नोटिशीत करण्यात आली आहे.

या सर्व बाबींवर संबंधित व्यवस्थापनाने तीन दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश नगरपरिषदेने दिले आहेत. समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यास महाराष्ट्र (पान ४ वर)

# घुलेवाडी ग्रामपंचायत सदस्य अपात्रतेला स्थगिती






युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील राजकीयदृष्ट्या संवेदनशील आणि जिल्ह्यातील मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक असलेल्या घुलेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच व दोन सदस्यांना अपात्र ठरविण्याच्या निर्णयाला विभागीय आयुक्तांनी स्थगिती दिली आहे. त्यामुळे स्थानिक राजकीय वर्तुळात या निर्णयाची मोठी चर्चा सुरू झाली आहे.

अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाने यापूर्वी घुलेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच आणि दोन सदस्यांना अपात्र घोषित केले होते. या निर्णयानंतर ग्रामपंचायतीच्या कारभारासाठी प्रशासक नियुक्त करण्याची प्रक्रिया देखील तातडीने राबविण्यात आली होती. मात्र, संबंधित पदाधिकाऱ्यांनी या निर्णयाविरोधात विभागीय आयुक्तांकडे दाद मागितली होती.

याच प्रकरणात विभागीय आयुक्तांनी २ जून रोजी अपात्रतेच्या निर्णयाला स्थगिती दिल्याने संबंधित लोकनियुक्त पदाधिकाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे ग्रामपंचायतीच्या निवडून आलेल्या प्रतिनिधींना पुन्हा कामकाज करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

घुलेवाडी ही संगमनेर तालुक्यातील वाढत्या लोकसंख्येची ग्रामपंचायत असून पिण्याच्या पाण्यासह विविध विकासकामांचे प्रश्न येथे सातत्याने चर्चेत असतात. सध्या गावातील पाणीपुरवठा योजनेचे महत्त्वाचे काम सुरू असून ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत राजकीय आरोप-प्रत्यारोपही होत असतात.

दरम्यान, विभागीय आयुक्तांच्या या निर्णयानंतर घुलेवाडी ग्रामपंचायतीतील राजकीय घडामोडींना नव्याने वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुढील सुनावणी व अंतिम निर्णयाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# चोरट्यांचा धुमाकूळ; दोन दिवसांत तीन घरफोड्या

## साडेतीन लाखांचा ऐवज लंपास



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहर व तालुक्यात कायदा-सुव्यवस्था आलबेल असल्याचे चित्र पोलिसांकडून रंगविले जात असले, तरी प्रत्यक्षात चोऱ्या, घरफोड्या, चैन स्नॅचिंग आणि हाणामाऱ्यांच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांचा धाक उरला नसल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत असून, मागील दोन दिवसांत शहरात तब्बल तीन घरफोड्यांच्या घटना घडल्या आहेत. या घटनांमध्ये सुमारे ३ लाख ४८ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने व अन्य मौल्यवान वस्तू चोरीस गेल्या आहेत.

विशेष म्हणजे, यापूर्वीच्या अद्याप तपासाच्या फेऱ्यात असतानाच नव्या घटना घडत असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित फिरत असताना अवैध धंदे मात्र राजरोस सुरू असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.

**झोपलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन लंपास-**


शहरातील रहेमतनगर-जोर्वे नाका परिसरात धक्कादायक चोरीची घटना घडली. घरात झोपलेल्या महिलेच्या गळ्यातील १ लाख १० हजार रुपये किंमतीची सोन्याची चैन चोरट्यांनी लंपास केली. याप्रकरणी आशिया गुलाम शेख यांनी फिर्याद दाखल केली असून झीनत नाजिम अन्सारी हिचे नाव आरोपी म्हणून समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले.

**खिडकीचे ग्रील उचकटून दीड लाखांहून अधिक ऐवज चोरी -**

गुंजाळवाडी परिसरात अज्ञात चोरट्यांनी घराच्या पाठीमागील खिडकीचे ग्रील उचकटून घरात प्रवेश केला आणि १ लाख ८८ हजार रुपयांचे (पान ४ वर)













# संगमनेरात भाजीपाला विक्रेत्यांचा अतिक्रमण विरोधी पथकावर हल्ला

## दोघांवर विविध कलमांन्वये गुन्हा दाखल



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील पेटीट सर्कल येथे सोमवारी (दि.१) सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास नगरपालिकेचे अतिक्रमण पथक आणि रक्षक दल यांच्या मार्फत फूटपाथवरील भाजीपाला विक्रेत्यांचे अतिक्रमण काढले जात होते. या कारवाईला या भाजी विक्रेत्यांनी विरोध दर्शविला आणि ठिय्या दिला. यातील दोघाजणांनी या पथकाला शिवीगाळ व दमदाटी करत हल्ला केला आणि सरकारी कामात अडथळा आणल्याचा गंभीर प्रकार घडला आहे. याप्रकरणी संगमनेर शहर पोलिसांत दोघांवर विविध कलमांन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत शहर पोलिसांकडून मिळा-लेली माहिती अशी, की पेटीट सर्कल परिसरात रस्त्याच्या दुतर्फा फूटपाथवर अनेक भाजीपाला विक्रेते बसत आहे. यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. याबाबत नगरपालिकेकडे तक्रारी देखील आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पालिकेने सोमवारी सायंकाळी ४ वाजता रस्त्याच्या कंडेला अथवा फूटपाथवर कोणीही भाजीपाला विक्रीसाठी बसू नये, अतिक्रमण मोहीम राबविण्यात येणार असल्याच्या सूचना दिलेल्या होत्या. तरी देखील भाजीपाला विक्रेते शुभम ढोले (पूर्ण नाव माहीत नाही, रा. घोडेकर मळा, संगमनेर) आणि विलास पंधारे (पूर्ण नाव माहीत नाही, रा. देव-ाचा मळा, संगमनेर) यांनी अतिक्रमण पथकावर हल्ला करतं शिवीगाळ व दमदाटी केली.

तसेच भाजीपाला पथकावर फेकून कारवाईस विरोध करत शासकीय कामकाजात अडथळा आणला. तर पंधारे याने पथकास शिवीगाळ व दमदाटी करुन रक्षक दलाच्या वाहनात असलेल्या कर्मचाऱ्याच्या छातीत लाथ मारली. याप्रकरणी पालिकेचे अतिक्रमण विभागप्रमुख महेश गोर्डे (वय ३३, रा. नगरपरिषद, संगमनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वरील दोघांविरोधात भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. पारधी हे करत आहे.

# मुख्याध्यापक दशरथ वर्पे यांच्याकडून आदिवासी मुलांच्या वस्तीगृहासाठी ५ लाख रुपयांची देणगी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -माजी शिक्षण मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात व मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली जयहिंद आदिवासी आश्रम शाळा कोळवाडे येथे ज्ञानदानाचे काम करताना सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात योगदान देणारे कृतिशील सेवाव्रती मुख्याध्यापक दशरथ विठोबा वर्पे यांनी आदिवासी व गोरगरीब विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी वस्तीगृहसाठी ५ लाख रुपयांची देणगी दिली आहे.



जयहिंद आदिवासी आश्रम शाळा कोळवाडे येथे माजी विद्यार्थ्यांच्या वतीने आयोजित सेवापुर्ती सोहळा व सेवाव्रती या गौरवग्रंथाच्या प्रकाशन कार्यक्रमात त्यांनी ही देणगी सेवाभावी ट्रस्ट साठी डॉ. जयश्रीताई थोरात यांच्याकडे सुपूर्द केली. यावेळी माजीमंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, नाशिक विभागाचे आयकर आयुक्त भरत आंधळे, आदिवासी विकास विभागाचे सेवानिवृत्त अप्पर आयुक्त सूर्यकांत हिंगोनेकर, सौ. दुर्गाताई तांबे, फादर रॉबर्ट डिकोस्टा, दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख, बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी, मंगलताई वर्पे, वडील विठोबा वर्पे, उद्योजक मनीष मालपाणी, विष्णुपंत रहाटळ, दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे, रामहरी कातोरे, के. के. थोरात, महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागातदार संघटनेचे संचालक नंदू भाऊ पवार, वूड अँड ड्र्सचे संचालक वेदांत पाबळ, प्रा. बाबा खरात, काशिनाथ गोंदे, अक्षय वर्पे, भाऊसाहेब नवले, इगतपुरी येथील नंदू गाढवे, कचरू पाटील डुकरे, यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून संगमनेर व अकोले तालुक्यातील गोरगरीब व आदिवासी विद्यार्थ्यांकरता २ ऑक्टोबर १९९४ मध्ये कोळवाडे येथे जयहिंद आदिवासी आश्रमशाळा सुरू करण्यात आली. लोकनेते बाळासाहेब थोरात व मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्या दिवसापासून शिक्षक व मुख्याध्यापकपदाची जबाबदारी सांभाळणारे दशरथ वर्पे यांनी या शाळेच्या वाटचालीत आपले आयुष्य समर्पित केले. गुणवत्ता, शिस्त, नवनवीन योजना राबवताना शाळेला राज्यपातळीवर लौकिक मिळवून दिला.

या शाळेला राज्य पातळीवरील उत्कृष्ट आदिवासी आश्रम शाळा हा पुरस्कार मिळवून दिला.याचबरोबर शाळेच्या परिसरामध्ये सुंदर वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा मंत्र विद्यार्थ्यांना संस्काररूपी रुजवला. कोळवाडे गावच्या सामाजिक विकासात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले असून मोरया डोंगर याचबरोबर हार्मन हिल हिरवाई करण्यात त्यांनी मोठा सिंहाचा वाटा उचलला.

संगमनेर तालुक्यात दंडकारण्य अभियानाचे समन्वयक म्हणून त्यांनी अत्यंत मोठी जबाबदारी सांभाळत चांगले काम केले आहे. वृक्षारोपणाची संवर्धनाची आवड असणाऱ्या मुख्याध्यापक दशरथ वरपे यांनी सातत्याने नव्या पिढीला मार्गदर्शन केले आहे. आपल्या कृतिशील सेवाव्रती आदर्श मधून त्यांनी जयहिंद आदिवासी आश्रम शाळेच्या गोरगरीब विद्यार्थ्यांच्या वस्तीगृहासाठी वर्पे कुटुंबीयांच्या वतीने पाच लाख रुपयांची देणगी कुटुंबाच्या वतीने दिली आहे.

### आदिवासींसाठी आयुष्य वेचले - दशरथ वर्पे

**शिक्षण हे समाज प्रगतीचे माध्यम आहे. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात व फादर हारमन बाकर यांचे संस्कार घेऊन लोकनेते बाळासाहेब थोरात व मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी व गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी मी आयुष्यभर काम केले. या शाळेतून अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन मोठे झाले त्यांचे कुटुंब आज आनंदी आहे. परिसरात वृक्षराई वाढली आहे तालुक्यात दंडकारण्य अभियानामुळे वृक्ष संवर्धन संस्कृती वाढत आहे. सर्वसामान्य आदिवासी बांधवांच्या जीवनात निर्माण झालेला आनंद हे माझ्या जीवनातील सर्वात मोठे भांडवल आहे. या शाळे प्रती कृतज्ञता म्हणून माझ्या कुटुंबीयांच्या वतीने ५ लाख रुपयांची देणगी वस्तीगृहासाठी दिली आहे.**

# शेतकरी कर्जमाफीचे निकष जाहिर

## पदाधिकारी, सरकारी कर्मचारी आणि २५ हजारांपेक्षा जास्त वेतनधारक अपात्र



### कोणत्या शेतकऱ्यांना मिळणार लाभ?

**१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या पीक किंवा कृषी कर्जाची थकबाकी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत शिल्लक असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न केलेली असल्यास संबंधित शेतकरी या योजनेसाठी पात्र ठरणार आहेत. एक किंवा अधिक बँकांमधील कर्जखात्यांवरील मुद्दल व व्याजासह एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाख रुपयांपर्यंत असल्यास ती संपूर्ण रक्कम माफ केली जाणार आहे.**

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्य सरकारने नुकतीच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' मंजूर केली असून, या योजनेअंतर्गत पात्र व अपात्र लाभार्थ्यांचे निकष स्पष्ट करण्यात आले आहेत. योजनेचा लाभ केवळ पात्र शेतकऱ्यांनाच मिळणार असून अनेक पदाधिकारी, सरकारी कर्मचारी आणि उच्च वेतनधारकांना या योजनेतून वगळण्यात आले आहे.

सरकारने जाहीर केलेल्या निकषांनुसार मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, महापालिका, नगरपालिका व नगरपंचायतींचे सदस्य, सरकारी कर्मचारी, सार्वजनिक उपक्रमांतील अधिकारी-कर्मचारी, अनुदानित संस्थांचे अधिकारी व कर्मचारी तसेच आयकर भरणाऱ्या व्यक्तींना कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही.

याशिवाय बाजार समित्या, साखर कारखाने, सुतगिरण्या, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, दूध संघ आदी सहकारी संस्थांचे पदाधिकारी व संचालक तसेच मासिक २५ हजार रुपयांपेक्षा अधिक वेतन घेणारे अधिकारी व कर्मचारी यांनाही या योजनेत अपात्र ठरविण्यात आले आहे. सरकारी आकडेवारीनुसार राज्यातील सुमारे १६ लाख ४८ हजार शेतकऱ्यांच्या १७ लाख ७५ हजार कर्जखात्यांवरील दोन लाख रुपयांपर्यंतचे संपूर्ण कर्ज माफ होणार आहे. त्यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे मानले जात आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे कर्जबाजारी शेतकऱ्यांना नव्याने उभारी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शिर्डी मेळाव्यात खासदार वाकचौरेंची दांडी

## शिवसेनेत खळबळ, चर्चेला उधाण

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे हे पुन्हा एकदा राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. गेल्या काही दिवसांपासून ते विरोधी गटाच्या संपर्कात असल्याच्या चर्चा रंगत असतानाच मंगळवारी शिर्डीत शिवसेनेच्या महत्त्वाच्या मेळाव्यातील त्यांच्या अनुपस्थितीमुळे या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे. त्यामुळे शिर्डीसह राज्याच्या राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.



या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते तथा माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी भाऊसाहेब वाकचौरे यांच्याबाबत उघड नाराजी व्यक्त केली आहे. भाऊसाहेब वाकचौरे यांनी विरोधी गटात जाऊ नये, असा सल्ला देताना चंद्रकांत खैरे यांनी त्यांच्याबद्दलची खंतही व्यक्त केली. त्यांच्या वक्तव्यामुळे राजकीय चर्चांना आणखी वेग आला आहे. विशेष म्हणजे, भाऊसाहेब वाकचौरे हे शिर्डी संस्थानचे कार्यकारी अधिकारी असताना चंद्रकांत खैरे यांनीच त्यांना सक्रिय राजकारणात आणण्यासाठी पुढाकार घेतला होता. त्यानंतर भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिवसेनेच्या तिकिटावर निवडणूक लढवत शिर्डी लोकसभा मतदारसंघात विजय मिळवला होता. मात्र, पुढील काळात काँग्रेसच्या संपर्कात गेल्यानंतर त्यांना निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागल्याची आठवणही चंद्रकांत खैरे यांनी करून दिली.

सध्या शिर्डीत ऑपरेशन टायगर यशस्वी होत असल्याच्या चर्चांदरम्यान भाऊसाहेब वाकचौरे यांच्या भूमिकेकडे विशेष लक्ष दिले जात आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातून खासदार झाल्यानंतरही त्यांनी पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांकडे पाठ फिरवली असल्याची भावना काही शिवसैनिकांमध्ये सुरू असल्याची चर्चा आहे. दरम्यान, भाऊसाहेब वाकचौरे यांच्या अनुपस्थितीमुळे निर्माण झालेल्या चर्चांवर अद्याप त्यांची अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. त्यामुळं ते खरोखरच राजकीय भूमिका बदलण्याच्या तयारीत आहेत की या केवळ अफवा आहेत. याबाबतचा संभ्रम कायम आहे. आता या सर्व घडामोडींवर स्वतः भाऊसाहेब वाकचौरे काय स्पष्टीकरण देतात. याकडं शिर्डी लोकसभा मतदारसंघासह संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे.

दरम्यान या प्रकारानंतर वंचित बहुजन आघाडीच्या प्रवक्त्या व शिर्डी लोकसभेच्या अपक्ष उमेदवार उत्कर्षा रुपवते यांनी म्हटले आहे की, शिर्डीत पुन्हा गद्दारीची चाहूल लागत असून असे झाल्यास पक्ष नेतृत्व आणि शिवसैनिक त्याचबरोबर सर्वसामान्य मतदार यांच्याशी मोठी प्रतारणा होणार आहे.

# ऊर्जा क्षेत्रातील परिवर्तनाचा निर्णायक टप्पा




भारताने २०३१ ते २०३५ या कालावधीसाठी जाहीर केलेल्या अद्ययावत राष्ट्रीय निर्धारित योगदानामध्ये एक महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित केले आहे. देशाच्या एकूण स्थापित वीज क्षमतेपैकी ६० टक्के क्षमता ही जीवाश्म इंधनाव्यतिरिक्त स्रोतांवर आधारित असावी, असा निर्धार करण्यात आला आहे. हवामान बदलाच्या आव्हानांचा सामना करताना भारताने स्वच्छ ऊर्जेकडे वाटचाल करण्याचा निर्धार दाखवला असला, तरी अलीकडील जागतिक घडामोडींनी ऊर्जा सुरक्षेचे नवे पैलू समोर आणले आहेत. विशेषतः मध्यपूर्वेतील वाढता तणाव आणि इराणविरोधातील संघर्षाने जगाला पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की ऊर्जा पुरवठ्यावर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था किती असुरक्षित असू शकते.

भारताने सौर आणि पवन ऊर्जेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. आज देशात २५० गिगावॅटपेक्षा अधिक गैर-जीवाश्म क्षमता उभारण्यात आली आहे. स्थापित क्षमतेत या स्रोतांचा वाटा जवळपास निम्मा झाला आहे. मात्र, प्रत्यक्ष वीज निर्मितीमध्ये त्यांचे योगदान अद्याप सुमारे एक चतुर्थांश इतकेच आहे. यावरून स्पष्ट होते की केवळ क्षमता वाढविणे पुरेसे नाही. स्वच्छ ऊर्जेचा पुरवठा विश्वासार्ह, सातत्यपूर्ण आणि परवडणारा असणे तितकेच आवश्यक आहे.

भारतातील वीज व्यवस्थेची रचना मूळतः कोळसा आधारित होती. कोळशावर चालणारे प्रकल्प निश्चित आणि अंदाजे स्वरूपात वीज पुरवतात. मात्र, सौर आणि पवन ऊर्जा हवामानावर अवलंबून असल्याने त्यांचा पुरवठा बदलता असतो. परिणामी, ऊर्जा संक्रमणाच्या पुढील टप्प्यात भारतासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे वीज जाळ्याची पुनर्रचना करणे हे आहे. राजस्थान, गुजरात यांसारख्या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर नूतनीकरणीय ऊर्जा निर्माण होत असताना झारखंड, बिहार, छत्तीसगडसारख्या राज्यांमध्ये विजेची मागणी वेगाने वाढत आहे. अनेकदा एका भागात ऊर्जा अधिशेष असतो, तर दुसऱ्या भागात तुटवडा जाणवतो. अशा परिस्थितीत मजबूत आणि लवचिक प्रसारण व्यवस्था उभारणे अत्यावश्यक ठरते.

ऊर्जा सुरक्षेचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे संचयन क्षमता. सौरऊर्जा दिवसा उपलब्ध होते, परंतु मागणी अनेकदा संध्याकाळी आणि रात्री वाढते. त्यामुळे ऊर्जा साठवणूक तंत्रज्ञानाचा विकास हा संक्रमणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. बॅटरी संचयन, पंप्ड हायड्रो आणि इतर आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्वच्छ ऊर्जेचा सातत्यपूर्ण पुरवठा सुनिश्चित करता येऊ शकतो. अन्यथा स्वस्त सौरऊर्जा असूनही आवश्यक वेळी वीज उपलब्ध राहणार नाही.

भारतातील वीज बाजारपेठांनाही बदलत्या वास्तवाशी जुळवून घ्यावे लागेल. आतापर्यंत विजेचे मूल्यांकन केवळ उत्पादित युनिट्सच्या आधारावर केले जात होते. मात्र, भविष्यात ऊर्जा, क्षमता आणि लवचिकता या तिन्ही घटकांना समान महत्त्व द्यावे लागेल. जगातील अनेक प्रगत देशांनी उपलब्धता आणि प्रतिसादक्षमता यांचे स्वतंत्र मूल्यनिर्धारण सुरू केले आहे. भारतालाही या दिशेने पावले उचलावी लागतील, जेणेकरून संचयन आणि हायब्रिड प्रकल्पांना प्रोत्साहन मिळेल.

ऊर्जा क्षेत्रातील सर्वात कमकुवत दुवा म्हणजे वितरण व्यवस्था. देशातील अनेक वीज वितरण कंपन्या अजूनही आर्थिक संकटातून जात आहेत. मोठ्या प्रमाणावरील अनुदाने, क्रॉस सबसिडी आणि कार्यक्षमतेतील त्रुटी यामुळे त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत झाली आहे. त्यामुळे ऊर्जा संक्रमण यशस्वी करण्यासाठी वितरण व्यवस्थेतील सुधारणा अपरिहार्य आहेत. कृषी आणि गैर-कृषी पुरवठ्याचे विभाजन, फीडर स्तरावर सुधारणा आणि सौरिकीकरण यांसारख्या उपाययोजना यासाठी महत्त्वाच्या ठरतील.

आज भारत ऊर्जा संक्रमणाच्या निर्णायक टप्प्यावर उभा आहे. सुरुवातीचा काळ क्षमता वाढविण्याचा होता, तर आता विश्वासार्हता, लवचिकता आणि कार्यक्षमतेचा आहे. भविष्यात भारताने किती मेगावॅट क्षमता उभारली यापेक्षा देशातील प्रत्येक नागरिक, उद्योग आणि शेतकऱ्याला अखंड व परवडणारा वीजपुरवठा मिळतो का, हेच प्रगतीचे खरे मोजमाप ठरणार आहे. ऊर्जा सुरक्षा आता केवळ उत्पादनाची बाब राहिलेली नाही; ती राष्ट्रीय आर्थिक स्थैर्य, विकास आणि आत्मनिर्भरतेचा आधारस्तंभ बनली आहे. त्यामुळे स्वच्छ ऊर्जा, मजबूत पायाभूत सुविधा आणि प्रभावी धोरणात्मक सुधारणा यांचा समतोल साधणे हीच काळाची गरज आहे.

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेत किसन अभंग यांचा सेवापूर्ती सोहळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये स्थापना कालापासून तब्बल २९ वर्षे प्रामाणिकपणे, निष्ठेने व समर्पित भावनेने सेवा बजावल्यानंतर निवृत्त झालेल्या किसन शिवराम अभंग यांचा सेवापूर्ती सोहळा संस्थेच्या माळीवाडा येथील कार्यालयात उत्साहात संपन्न झाला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी किसन अभंग यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या प्रदीर्घ सेवेमुळे संस्थेच्या प्रगतीत मोलाचे योगदान लाभल्याचे सांगितले. संस्थेच्या जडणघडणीत आणि विकासात त्यांनी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील, असे गौरवोद्गार व्यक्त करण्यात आले. तसेच त्यांच्या पुढील आयुष्यास उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी आणि आनंद लाभो, अशा शुभेच्छा संस्थेचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांनी दिल्या.

याच कार्यक्रमात अरुण लहानू ताजणे व नगरसेवक नितीन बाजीराव अभंग यांची शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळ सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास संस्थापक गोपीनाथ भाऊराव अभंग, चेअरमन सुभाष हरिभाऊ पावबाके, व्हाईस चेअरमन श्रीकांत गोपीनाथ अभंग, संचालक कैलास गंगाधर ढोले, माधव संतुजी अभंग, कैलास देवराम अभंग, सुभाष दत्तात्रय मंडलिक, विष्णू रघुनाथ मंडलिक, नितीन दशरथ अभंग, ऋतिक संतोष हिरे, चांगदेव रामभाऊ केदारी, संदीप मोहन सावंत, सौ. नंदा मल्हार ढोले, सौ. अर्चना प्रविण क्षीरसागर, सुधाकर पुंजाजी ताजणे, अनिल ज्ञानेश्वर मंडलिक, भारत रंगनाथ ताजणे, कैलास धोंडिबा गाडेकर, व्यवस्थापक कैलास सूर्यभान पवार यांच्यासह कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात निवृत्त कर्मचारी किसन अभंग यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला तसेच नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५



# जिजामाता स्कूलमध्ये सीबीएसई गुरु दक्षता शिक्षक प्रशिक्षण उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दि. २६ व २७ मे रोजी सीबीएसई बोर्ड द्वारा 'गुरु दक्षता' हा शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रशिक्षणासाठी पोदार इंटरनॅशनल स्कूल, नाशिकचे प्राचार्य डॉ. मनोहर महाजन आणि प्रियदर्शिनी इंटरनॅशनल स्कूल, नाशिकच्या प्राचार्या डॉ. पराग अग्रवाल प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते, तर शाळेच्या प्राचार्या ॲड. जिज्ञासा कुलकर्णी यांनी व्हेनू डायरेक्टर म्हणून काम पहिले

प्रशिक्षणा दरम्यान शिक्षकांना सीबीएसईच्या विविध शैक्षणिक उपक्रमांची सविस्तर माहिती व प्रशिक्षण देण्यात आले. विशेषतः सीबीएसई पोर्टलचा वापर, अभ्यासक्रम रचना, परीक्षा पद्धती, मूल्यमापन प्रक्रिया तसेच डिजिटल शिक्षण साधनांचा प्रभावी उपयोग याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षकांनी शिक्षकांना आधुनिक शिक्षणपद्धती, विद्यार्थीकेंद्रित अध्यापन आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अध्यापन कौशल्य विकसित करण्यासाठी विशेष मार्गदर्शन केले. तसेच सीबीएसई प्रशिक्षण पोर्टलद्वारे व्यावसायिक विकासासाठी उपलब्ध असलेल्या विविध प्रशिक्षण सत्रांची माहितीही देण्यात आली. यावेळी शिक्षकांनी विविध शंका विचारून मार्गदर्शन घेतले. प्रशिक्षणामुळे अध्यापन अधिक परिणामकारक व तंत्रज्ञानाधारित करण्यास मदत होईल असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला. कार्यक्रमामुळे शिक्षकांमध्ये नवीन ऊर्जा व आत्मविश्वास निर्माण झाल्याचे मत व्यक्त करण्यात आले. प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन, प्रशासन, प्राचार्या, उपप्राचार्या, सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# जलसंपदा कार्यालयांच्या स्थलांतराच्या निर्णयावर उच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब

जिल्हा माहिती कार्यालय -

अहिल्यानगर - गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अंतर्गत असलेल्या कार्यालय स्थलांतराच्या निर्णयाविरोधात छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली याचिका फेटाळण्यात आली असून, जलसंपदा विभागाच्या धोरणात्मक निर्णयावर उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे.

शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून कृष्णा व गोदावरी पाटबंधारे महामंडळाने प्रदेश, मंडळ आणि विभाग स्तरावरील कार्यालयांच्या पुनर्रचनेचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता. सिंचन प्रशासन गतिमान आणि लोकाभिमुख व्हावे, तसेच या निर्णयाचा लाभ शेतकरी, नागरिक आणि लोकप्रतिनिधींना व्हावा, हीच यामागची भूमिका होती. सिंचनविषयक कामांसाठी लोकप्रतिनिधी, शेतकरी व नागरिकांना कार्यालये जवळ तसेच धरण लाभक्षेत्रात असावीत, या उद्देशाने महामंडळाच्या २७ मे २०२६ रोजीच्या बैठकीत हा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता. मात्र, जलसंपदा विभागाच्या निर्णयाविरोधात रौफ नवजा पटेल यांनी संभाजीनगर उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी होऊन न्यायालयाने सदर याचिका खारीज केली आहे.

आजच्या न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान माननीय न्यायालयाने पक्षकाराला सदरचे काम हे प्रशासकीय आहे, मात्र समाजमाध्यमांतून प्रसारित झालेली कागदपत्रे घेऊन न्यायालयात याचिका दाखल केली आहे, असे म्हटले. तसेच सदरचे प्रकरण दाखल करताना पक्षकाराने कोणताही अभ्यास किंवा कागदपत्रांचे संशोधन केलेले नाही, असे अभिप्राय नोंदवले. याचसोबत, विभागाच्या मंत्र्यांना प्रतिवादी का केले? असा प्रश्नही केला. सदर याचिकेचे कामकाज चालू ठेवण्यासाठी २० लाख रुपये भरावे किंवा याचिका मागे घ्यावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आणि यासाठी १५ मिनिटांचा कालावधी दिला होता. त्यावर पक्षकाराने याचिका मागे घेत असल्याचे न्यायालयासमोर सांगितले.




कार्यालय स्थलांतर करण्याचा महामंडळाचा निर्णय असून, राज्यातील नदीजोड प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी तसेच जलसंपदा विभागाच्या योजनांच्या व निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी घेतलेला हा धोरणात्मक निर्णय असल्याचे निरीक्षण न्यायालयाने याचिका फेटाळताना नोंदवले. राज्य सरकारच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ जी. पी. गिरासे, गोदावरी पाटबंधारे महामंडळाच्या वतीने सीनियर कौन्सिल विनायक होन आणि विधिज्ञ सुभाष तांबे यांनी बाजू मांडली. महामंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी १ जूनपासून सुरू झाली आहे. अनेक वरिष्ठ अधिकारी त्यांच्या नेमणुकीच्या कार्यालयांत हजर झाले. मात्र, तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनांच्या वतीने विभागाच्या निर्णयाविरोधात आंदोलने सुरू करण्यात आली होती. आजच्या न्यायालयाच्या निर्णयामुळे आता सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणे क्रमप्राप्त होणार आहे.

दीर्घकाळापासून जलसंपदा विभागाचे निर्णय धरण लाभक्षेत्रापासून दूरवर असलेल्या कार्यालयांतून होत होते. लाभक्षेत्रातील लोकप्रतिनिधी, शेतकरी, अभियंते आणि कर्मचारी यांनाही कामकाजाकरिता अनेक जिल्ह्यांचा प्रवास करून जावे लागत होते. निर्णय आणि अंमलबजावणी यामध्ये लागणारा विलंब कमी करण्यासाठी जलसंपदा विभागाने कार्यालय स्थलांतराचा निर्णय घेतला आहे. नैसर्गिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय स्तरावर सक्षम प्रशासन उभे करण्याच्या दृष्टीने जलसंपदा विभागाचा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात असून त्याचे सर्वत्र स्वागत होत आहे. आजच्या न्यायालयाच्या निर्णयामुळे आता त्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

# कत्तलखान्यांवर पालिकेचा...

पान १ वरून -

या मोहिमेत नगरपालिकेचे प्रशासकीय अधिकारी प्रल्हाद देवरे, अतिक्रमण विभाग प्रमुख महेश गोरडे, प्रदीप मावळकर, अल्ताफ शेख, जयराम मंडलिक, राजेंद्र म्हस्के, किशोर बिडगर यांच्यासह पालिकेचे अधिकारी-कर्मचारी आणि शहर पोलिस ठाण्याचे मोठे पथक सहभागी झाले होते. मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी सांगितले की, शहरातील बेकायदेशीर बांधकामे, अतिक्रमणे आणि अनधिकृत कत्तलखान्यांविरोधात प्रशासनाची कारवाई यापुढेही सुरू राहणार आहे.

नागरिकांच्या आरोग्याचा, स्वच्छतेचा आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेऊन अशा प्रकारच्या अनधिकृत व्यवसायांवर कठोर कारवाई केली जाईल. या धडक कारवाईमुळे शहरातील अनधिकृत कत्तलखाना चालकांमध्ये खळबळ उडाली असून, अतिक्रमणमुक्त आणि स्वच्छ शहराच्या दिशेने प्रशासनाने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आह

वाकी आदिवासी जि. प. शाळेच्या मुख्याद्यापक
अर्चना शेळके पाटील
यांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
शेळके परिवार

# एकाच दिवशी ४११ वाढदिवस; जोर्वेने जपली एकतेची अनोखी परंपरा

## प्रवराकाठची जोर्वे संस्कृती जगाच्या नकाशावर - बाळासाहेब थोरात

संगमनेर (प्रतिनिधी) : एक जून वाढदविसाला जोर्वे गावाने एक वेगळाच आयाम दिला. गावातील महिला व नागरिकांनी एकत्र येऊन तब्बल ४११ जणांचा एकाच वेळी पारंपारिक थाटात सामूहिक वाढदिवस साजरा केला. प्रत्येकाला फेटा बांधण्यात आला, केक कापण्यात आला आणि शाल व बुके देऊन सर्वांचा सन्मान करण्यात आला. या आदर्श परंपरेबद्दल बोलताना माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांगितले की, प्रवराकाठच्या जोर्वे संस्कृतीचा उल्लेख आज आंतरराष्ट्रीय पातळीवर होत आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. नागरिकांनी ही समृद्ध परंपरा जपत पुढची पिढी उत्तम घडवावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.



जोर्वे येथील लक्ष्मीआई मंदिरामध्ये हा भव्य सोहळा पार पडला. म. मंत्री बाळासाहेब थोरात, इंद्रजीत थोरात, शरद थोरात, संगमनेर सह. औद्योगिक वसाहतीचे चेअरमन के. के. थोरात, कर्करोगतज्ज्ञ डॉ. जयश्री थोरात, बादशहा बोरकर, विठ्ठल जाधव, अनिल थोरात, संजय थोरात, माणिकराव यादव, संपत थोरात, सोपान कोल्हे, वसंत बोरकर, राजू थोरात, दिगंबर इंगळे, जगन दिघे, कैलास इंगळे, हरिभाऊ इंगळे, दत्तू नाना काकड, बंटी यादव, भाऊसाहेब दिघे, संतोष जाधव, विठ्ठल जाधव, महेंद्र माळी, अमोल दिघे, भारत बलसाने, केशव बलसाने, मुकेश काकड, रमेश दिघे, नारायण वाकचौरे, आशाताई क्षीरसागर, कुसुम दिघे, संगीता काकड, मीना इंगळे यांच्यासह गावातील असंख्य नागरिक या उत्सवाला आवर्जून उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले, दिल्ली येथील संग्रहालयात जोर्वे संस्कृतीची माहिती ठळकपणे मांडलेली आहे. या गावाला एक मोठी ऐतिहासिक परंपरा आहे आणि प्रत्येक नागरिकाने तिचा अभिमान बाळगला पाहिजे.

गावाच्या इतिहासाचा धांडोळा घेताना ते म्हणाले की, दामोदर पाटील थोरात यांनी सोसायटीची स्थापना केली, तर संतुजी पाटील थोरात यांनी गावचे पाटीलपद सांभाळत गावाला दिशा दिली. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतल्यानंतर सहकार क्षेत्रात काम सुरू केले. कारखान्यासह अनेक शिखर संस्था उभ्या केल्या आणि प्रत्येक गावात संस्थांचे जाळे विणले. त्याच वाटचालीचा धागा पुढे कायम ठेवत राज्यपातळीवरही काम केले. तालुका आणि गावाचा लौकिक उंचावत नेला.

गावातील नागरिकांनी कायम भरभरून प्रेम दिले आणि पाठीशी उभे राहिले. थोरात परिवाराची गावाशी असलेली नाळ कधीही तुटलेली नाही. विविध मंदिरांच्या उभारणीपासून ते गावाच्या सर्वांगीण विकासापर्यंत आपण नेहमीच झटलो आहोत. पंडित तात्या थोरात यांच्या पुढाकाराने दत्त मंदिर अत्यंत सुंदर झाले आहे. आता गणपती मंदिराचेही काम करायचे आहे. गावाच्या विकासात कधीही भेदभाव केला नाही आणि मातीशी इमान राखत गावाशी नाते जोडून ठेवले आहे, असे त्यांनी सांगितले.

आपल्या तालुक्याची राजकारणाची एक चांगली परंपरा असल्याचे नमूद करत थोरात यांनी सांगितले, कुटुंब घडवताना पुढची पिढी चांगली घडेल याची काळजी प्रत्येकाने आवर्जून घ्यावी.

डॉ. जयश्री थोरात यांनी सर्वांना वाढदविसाच्या शुभेच्छा देत जोर्वेच्या एकीचे उल्लेख केला. शरद थोरात यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, सर्वप्रथम आपापसातील मतभेद मिटवले पाहिजेत. के. के. थोरात आणि माणिकराव यादव यांच्यासह अनेक नागरिकांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंद्रजीत थोरात यांनी केले. सूत्रसंचालन रामदास काकड यांनी केले, तर हर्षल काकड यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास गावातील नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उत्साहाने सहभागी झाले होते.

# अंतरंगातील आठ पुष्पे देवाला अर्पण करा

## अधिकमास निमित्ताने...

अधिक महिन्यामध्ये आपण पुरुषोत्तम भगवान विष्णू, कृष्ण यांची पूजा करतो. वेगवेगळ्या प्रकारची फुले गुलाब, मोगरा, झेंडू निशिगंध, जाई, जुई, जास्वंद, शेवंती अशी वेगवेगळी फुले वाहून आपण पूजा करतो. ती आवश्यकच आहे. भगवान विष्णूंनी सांगितले, ही फुले मला प्रिय आहेत. पण याहीपेक्षा मला जी आठ फुले प्रिय आहेत, ती मला अर्पण करा. कोणती आठ फुले भगवान विष्णू सांगतात...

अहिंसा प्रथमं पुष्पं, पुष्पमिन्द्रियनिग्रहः।
सर्वभूतदया पुष्पं, क्षमा पुष्पं विशेषतः।।
ज्ञानपुष्पं तपः पुष्पं, शान्तिपुष्पं तथैव च।
सत्यमेवाष्टविधं पुष्पं, विष्णोः प्रीतिकरं

भगवान विष्णु म्हणतात, मला आंतरिक गुणांची फुले हवी आहेत. ती म्हणजे १)अहिंसा, २)इंद्रियनिग्रह, ३)भूतदया ,४) क्षमा, ५)ध्यान, ६)ध्यान ७) योग आणि ८) सत्य. १) अहिंसा- भगवान विष्णू म्हणतात, प्रथम पुष्प मला अर्पण करायचे आहे ते अहिंसा आहे. अहिंसा याचा अर्थ फक्त शारीरिक हिंसा नव्हे. तर मनाने,वाणीने आणि आपल्या कर्माने कोणाचेही अहित न करणे. आत्मसंयम बाळगणे. सर्व प्राणीमात्रांबरोबर प्रेमभाव राखणे .न्यायप्रिय होणे. परंतू राष्ट्रविरोधी ,दुष्ट किंवा जे मानवतेच्या विरोधीआहेत त्याला दंड देणे आवश्यकच आहे. २) इंद्रिय निग्रह - दुसरे पुष्प हे इंद्रिय निग्रह आहे. माणसाची मनोवृत्ती चंचल आहे. या मनोवृत्तीवर नियंत्रण ठेवणे. तसेच काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यावर नियंत्रण ठेवणे. ३) भूत दया - हे तिसरे पुष्प आहे सर्व प्राणीमात्रांवर , मानव मात्रांबाबत प्रेम आणि दया आवश्यक आहे. दया ही उपकाराच्या भावनेने केलेली नको. ४) क्षमा- क्षमा विरस्यभूषणम. असे म्हटले आहे. क्षमा हे




आवश्यक करावी, परंतू जे राष्ट्राचे अहितच बघतात, स्त्रियांवर अत्याचार करतात, अशां बाबत कधीही क्षमा दाखवू नये. याचे मोठे उदाहरण आपल्याकडे आहे. पृथ्वीराज चौहान यांनी मोहम्मद घोरिला क्षमा केली. त्याचे काय परिणाम झाले सर्वांना माहित आहे. दुसरे उदाहरण युधिष्ठिर याच्या पत्नीचे अपहरण करणाऱ्या जयद्रथाला क्षमा केली गेली. त्याचा परिणाम काय झाला प्राणप्रिय अभिमन्यूला गमवावे लागले. ५) ध्यान- पाचवे पुष्प ध्यान आहे. आपल्या आत्मिक शांततेसाठी, आपल्या आरोग्यासाठी ध्यानधारणा अत्यंत आवश्यक आहे. ६) दान- सहावे पुष्प दान आहे. आपण दिलेले दान हे सात्विक असावे, निस्वार्थी असावे. दान देण्यामागे कोणताही स्वार्थी हेतू नसावा. उजव्या हाताने दिलेले दान डाव्या हाताला कळू नये असे गुप्त दान असावे. ७) योग - सातवे पुष्प योग आहे. आपल्या मनाला संतुलित ठेवण्यासाठी त्याला नियंत्रित ठेवण्यासाठी योग साधना अत्यंत आवश्यक आहे. योग याचा अर्थ जोडणे असा आहे. आपण देवाची पूजा करताना त्याच्याशी जोडलें गेले पाहिजे. ८) सत्य- वैदिक धर्मामध्ये आपली पहिली प्रार्थना आहे, सत्यं वद. सत्यभाव राखणे, सत्य वचन बोलणे, सत्य कर्म करणे आणि सत्य मार्गाने जाणे, असे भक्त भगवंताला आवडतात.या पुरुषोत्तम मासामध्ये विविध फुलांच्या सहाय्याने आपण पूजा करणारच आहोत, करतच आहोत. परंतू त्याबरोबर भगवान विष्णूंनी सांगितलेली ही आठ पुष्पे ( फुले) जर त्यांना अर्पण केली, तर खऱ्या अर्थाने पुरुषोत्तम मास आपण अत्यंत पवित्र भावनेने साजरा केला असे म्हणता येईल. कोणाला काय दान केले हे जाहीर करू नका. गुप्तदान याला खूप महत्त्व आहे. दान करताना कधी कधी देणारा मोठा, घेणारा लहान. त्यामुळे घेणाऱ्याच्या मनामध्ये न्यूनगंड निर्माण होतो आणि देणाऱ्याच्या मनामध्ये अहमगंड निर्माण होतो. म्हणूनच आपल्याला शास्त्रकारांनी सांगितले आहे की, दान आवश्यक करा. जे शक्य असेल ते करा. पण ते करताना ते गुप्त करा. अधिकस्य अधिक पुण्यं. या पुरुषोत्तम मासामध्ये आपण वरील आठ पुष्पे वाहून शुभचिंतन, शुभदर्शन, शुभ कथन आणि शुभ श्रवण करूया.

**प्रा. शशांक गंधे**
**संगमनेर, जि. अहिल्यानगर**
**मोबा.९८९०१६३६४२**

# कर्जमाफीत शेतकऱ्यांची फसवणूक संतापजनक

## - डॉ. अजीत नवले



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - कर्जमाफीसाठी सरकारने काढलेल्या शासन आदेशामध्ये अत्यंत जाचक अटी शर्ती लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या वेळची कर्जमाफी आज पर्यंतच्या सर्व कर्जमाफ्यांमध्ये सर्वात कडक अटी शर्ती असलेली व खूप कमी शेतकऱ्यांना लाभ देणारी ठरणार आहे. २०१९ मध्ये कर्जमाफी घेतलेले शेतकरी, ज्यांची संख्या तब्बल ३२ लाख २९ हजार इतकी आहे, जरी ते यावेळी थकित असले तरी त्यांना केवळ ५० हजार रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफी देण्यात येणार आहे. नियमित कर्जदारांना सुद्धा केवळ ५० हजार रुपये देण्यात येणार आहेत. त्यांनाही किमान दोन वर्ष नियमित कर्जदार असणे ही अट टाकण्यात आली आहे. अत्यल्प पगारावर राबणाऱ्या सहकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना कर्जमाफीतून वगळण्यात आले आहे. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन द्यायचे आणि आता २ लाख कर्ज माफ करणार सांगून बहुसंख्य शेतकऱ्यांची केवळ ५० हजारावर बोळवणूक करायची ही अत्यंत संतापजनक गोष्ट आहे. शेतकऱ्यांची घोर फसवणूक आहे असा आरोप माकपचे राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले यांनी केला आहे.

# संपादकीय...

## वृक्षतोड, वाढते जागतिक तापमान आणि शेतकऱ्यांवरील संकट

वृक्ष हे पृथ्वीचे फुफ्फुस मानले जातात. मानवाला प्राणवायू देण्यापासून ते पावसाचे चक्र सुरळीत ठेवण्यापर्यंत आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यापर्यंत वृक्षांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र आज विकास, उद्योगधंदे, रस्ते, गृहनिर्माण प्रकल्प तसेच काही ठिकाणी धार्मिक कार्यक्रम, उत्सव आणि विविध बांधकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर वृक्षांची कत्तल केली जात आहे. या बेसुमार वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला असून जागतिक तापमानवाढ, अनियमित पाऊस आणि शेतीसमोरील गंभीर संकटे निर्माण झाली आहेत. औद्योगिकीकरण आणि नागरीकरण ही काळाची गरज असली तरी त्यासाठी पर्यावरणाचा बळी दिला जात आहे. कारखाने, महामार्ग, औद्योगिक वसाहती आणि निवासी प्रकल्प उभारण्यासाठी हजारो झाडे तोडली जात आहेत. काही ठिकाणी धार्मिक स्थळांचा विस्तार, मोठे मेळावे, यात्रांसाठी जागा उपलब्ध करणे किंवा इतर धार्मिक उपक्रमांसाठीदेखील वृक्षतोड केली जाते. धर्म कोणताही असो, त्याचा मूलभूत संदेश निसर्ग संरक्षणाचा आहे. परंतु जेव्हा धार्मिक कार्यांच्या नावाखालीच निसर्गाची हानी होते, तेव्हा त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण समाजाला भोगावे लागतात. वृक्ष वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि प्राणवायू सोडतात. झाडे कमी झाल्याने वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण वाढते. यामुळे पृथ्वीचे तापमान सतत वाढत आहे. आज जगभरात उष्णतेच्या लाटा, विक्रमी तापमान आणि हवामानातील तीव्र बदल अनुभवास येत आहेत. पूर्वी एप्रिल-मे महिन्यांपुरते मर्यादित असलेले कडक ऊन आता वर्षातील अधिक काळ जाणवू लागले आहे. शहरांमध्ये काँक्रीटच्या जंगलांमुळे उष्णता अधिक वाढत आहे, तर ग्रामीण भागातही तापमानातील वाढीचा परिणाम स्पष्ट दिसून येतो. पावसाचे चक्र सुरळीत ठेवण्यात वृक्षांचा मोठा वाटा असतो. झाडांच्या पानांतून होणाऱ्या बाष्पोत्सर्जनामुळे वातावरणात आर्द्रता निर्माण होते. ही आर्द्रता ढग तयार होण्यास मदत करते. जंगलांचे क्षेत्र कमी झाल्याने वातावरणातील आर्द्रता घटते आणि पावसाचे स्वरूप बदलते. परिणामी काही भागात अतिवृष्टी तर काही भागात दीर्घकालीन दुष्काळ अशी परिस्थिती निर्माण होते. पूर्वी नियमित आणि संतुलित पडणारा पाऊस आता अनिश्चित झाला आहे. कधी पावसाळ्यात पाऊस पडत नाही, तर कधी काही दिवसांतच महिनाभराचा पाऊस कोसळतो.

या बदलांचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. भारतीय शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. पावसाचे आगमन उशिरा होणे, मध्येच खंड पडणे किंवा अवकाळी पाऊस पडणे यामुळे पिकांचे मोठे नुकसान होते. वाढलेल्या तापमानामुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होतो. पाण्याची गरज वाढते, परंतु भूजलपातळी खालावल्याने सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. अनेक शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणाचा सामना करावा लागतो. उत्पादन घटल्यामुळे आर्थिक नुकसान होते आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर परिणाम दिसून येतात. जागतिक तापमानवाढीमुळे कीड आणि रोगांचे प्रमाणही वाढत आहे. हवामानातील अनियमित बदलांमुळे पिकांची वाढ प्रभावित होते. फळबागा, भाजीपाला आणि धान्य पिकांवर त्याचा परिणाम होतो. शेतीचे नियोजन करणे कठीण बनले आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अनिश्चितता वाढली आहे. या समस्येवर उपाय म्हणून व्यापक वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन आवश्यक आहे. विकासकामे करताना पर्यावरणीय परिणामांचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. तोडलेल्या प्रत्येक झाडाच्या बदल्यात अनेक झाडे लावून ती जगविण्याची जबाबदारी शासन, उद्योगसंस्था आणि समाजाने स्वीकारली पाहिजे. धार्मिक संस्था आणि सामाजिक संघटनांनीही पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य देत वृक्षारोपण मोहिमा राबविल्या पाहिजेत. विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन राखणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे.

# डॉ. जालिंदर भोर यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य आरोग्य शिबीर

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - डॉ.जालिंदर भोर यांच्या वाढदिवसानिमित्त अकोले मेडिकल फाउंडेशन, डॉ. माने मेडिकल फाउंडेशन, रोटरी सेंट्रल अकोले, दर्शन रोटरी आय केअर अकोले - संगमनेर, हरिश्चंद्र अर्पण ब्लड स्टोरेज सेंटर, अकोले, अकोले तालुका शिवसेना व जे डी ग्रुप अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, महिला आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमास आमदार अमोल खताळ, आमदार डॉ. किरण लहामटे, आरोग्य सेवा नाशिक विभागाचे उपसंचालक डॉ. कपिल आहेर, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शामकांत शेटे, ह.भ.प. दीपक महाराज देशमुख, रोटरी सेंट्रलचे अध्यक्ष अमोल देशमुख, डॉ.अमोल भोर, मारुती मेंगाळ व रावसाहेब वाकचौरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिबिरामध्ये महिलांसाठी गर्भाशय मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग व मुखाच्या कर्करोगाची तपासणी करण्यात आली. या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ३०० हून अधिक रुग्णांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. ७० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर १०० महिलांची विशेष कर्करोग तपासणी करण्यात आली.



तसेच ६८ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.माने मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. स्वप्नील माने, जनसंपर्क अधिकारी बाळासाहेब सगळगिळे, डॉ. वैशाली बल्लाळ, डॉ. निकिता आंबेकर, सुरज विटनोर, कैलास खंडागळे, दिपाली वाघमारे, अश्विनी शिंदे, डॉ.तुषार गावडे, अकोले मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रकाश वाकचौरे, अर्पण रक्तपेढीचे गणेश झोडगे, दर्शन आय केअरचे डॉ. रोहित शिंदे, कॅम्प प्रमुख संदीप घुले, सिकंदर पठाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

तसेच अकोले तालुका शिवसेना, जेडी ग्रुप अकोले, जगनशेठ देशमुख, मारुती मेंगाळ, बाळासाहेब भोर, डॉ.मुकुंद भोर, सचिन शेटे, अनिल शेणकर, सुशांत गजे, जावेद जहागीरदार, प्रकाश पाचपुते, विद्याचंद्र सातपुते, अनिल माने, राहुल जाधव, महेश धुमाळ, सचिन भालेराव, स्वप्नज घोडके आणि गोविंद झोळेकर यांनी शिबिर यशस्वी होण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या आरोग्य संवर्धनासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

# देशाच्या विकासाचा पाया असलेल्या जनगणनेसाठी नागरिकांनी पुढे यावे : आयुक्त यशवंत डांगे यांचे आवाहन

जिल्हा माहिती कार्यालय-

अहिल्यानगर - देशाच्या भविष्याचा आराखडा तयार करणाऱ्या आणि शासनाच्या विकास योजनांना दिशा देणाऱ्या जनगणना २०२७ च्या घरगणना टप्प्यातील पहिले पंधरा दिवस पूर्ण झाले आहेत.या कामास गती मिळून विहित मुदतीत जनगणना कार्य पूर्ण व्हावे म्हणून प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी अहिल्यानगरकरांना आवाहन केले आहे.

आपल्या दारी येणारा प्रगणक हा केवळ कर्मचारी नसून तो राष्ट्रनिर्मितीच्या महत्त्वपूर्ण कार्याचा दूत आहे. उन्हाचा तडाखा, व्यस्त दिनक्रम आणि विविध अडचणींचा सामना करत तो आपल्या घरापर्यंत पोहोचत आहे. अशा वेळी दरवाजा न उघडणे, माहिती देण्यास टाळाटाळ करणे किंवा चुकीची माहिती देणे हे केवळ जनगणना प्रक्रियेलाच नव्हे तर देशाच्या विकासालाही अडथळा निर्माण करणारे ठरते, असे आयुक्त डांगे यांनी म्हटले आहे. ते पुढे म्हणाले की, जनगणना ही कोणत्याही व्यक्तीची किंवा कार्यालयाची मोहीम नसून ती संपूर्ण राष्ट्राची जबाबदारी आहे. आज आपण दिलेली अचूक माहिती उद्याच्या पिढ्यांसाठी शाळा, रस्ते, रुग्णालये, पाणीपुरवठा, घरे आणि विविध कल्याणकारी योजनांचे नियोजन



ठरविण्यास मदत करते. त्यामुळे जनगणना म्हणजे केवळ माहिती संकलन नसून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेली एक अमूल्य गुंतवणूक आहे.

जनगणना कायदा, १९४८ अंतर्गत संकलित होणारी सर्व माहिती पूर्णतः गोपनीय असून ती कोणत्याही व्यक्ती, संस्था किंवा विभागाला वैयक्तिक स्वरूपात दिली जात नाही. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही शंका किंवा भीती न बाळगता सत्य, अचूक आणि संपूर्ण माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. घरगणनेचे उर्वरित १५ दिवस अत्यंत महत्त्वाचे असून १४ जून २०२६ पर्यंत हे कार्य पूर्ण करावयाचे आहे. त्यामुळे प्रत्येक अहिल्यानगरकराने आपल्या दारी आलेल्या प्रगणकाचे स्वागत करावे, काही मिनिटांचा वेळ द्यावा आणि मोबाईलवर होणारी जनगणना प्रक्रिया पूर्ण करून देशाच्या या ऐतिहासिक राष्ट्रीय मोहिमेत आपला मोलाचा सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयुक्त डांगे यांनी केले आहे.

# चोरट्यांचा धुमाकूळ...

पान १ वरून -

सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल फोन व सीसीटीव्ही कॅमेरे चोरून नेले. याप्रकरणी ॲड. राजेंद्र दत्तात्रय दवंगे यांनी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

**कॉलेज रोड परिसरातही घरफोडी** - शहरातील स्नेह बंगला, शारदा बेकरीच्या पाठीमागील कॉलेज रोड, गुंजाळवाडी शिवार परिसरातील बाबासाहेब दादाभाऊ वर्पे यांच्या घरातही घरफोडी झाली. चोरट्यांनी खिडकी तोडून घरात प्रवेश करत ५० हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याची नोंद पोलिसांत करण्यात आली आहे.

अवघ्या दोन दिवसांत सलग तीन घरफोड्या झाल्याने शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनांचा तपास करून चोरट्यांना जेरबंद करण्याचे मोठे आव्हान आता शहर पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. मागील घरफोड्या आणि चोरीच्या घटनांमधील तपासाची प्रगती काय, असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत.

दरम्यान, बसस्थानक परिसरातील चैन स्नॅचिंग, पाकीटमारी आणि इतर गुन्हे अद्याप सुरूच असल्याचे चित्र आहे. त्यामुळे पोलिसांचा धाक केवळ सर्वसामान्य नागरिकांपुरताच मर्यादित राहिला असून, गुन्हेगार आणि अवैध धंदे करणाऱ्यांना मात्र अभय मिळत असल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# संगमनेरात संविधान अमृत महोत्सव व पुरस्कार वितरण सोहळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील तेजस सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रविंद्र घोसाळे यांच्या संकल्पनेतून, गुरुवार (दि. ४ जून) रोजी सकाळी १० वाजता शहरातील मालपाणी लॉन्स येथे संविधान अमृत महोत्सव आणि राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रेरणादायी कार्यक्रमात संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल ७५ बौद्ध उपासक, उपासिकांना राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. संघराज रुपवते, उद्घाटक म्हणून माजी मंत्री बाळासाहेब थोरात, प्रमुख उपस्थिती म्हणून माजी आमदार डॉ. सुधीर तांबे व आमदार डॉ. किरण लहामटे आहेत. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबोडकर व समाज उत्कर्षाची मूलतत्वे या विषयावर प्रा. मुकुंद भारसाकळे यांचे व्याख्यान आयोजित केले.

या ऐतिहासिक कार्यक्रमात संविधान अमृत महोत्सव समिती संगमनेर अकोलेच्या संयुक्त विद्यमाने राज्याच्या ३६ जिल्ह्यातील बौध्द समाजातील चार पिढींचे इतिहास प्रसिद्ध घराण्यांच्या वारसदारांसह बौद्ध समाजातील धम्म, कला, क्रीडा, साहित्यिक, कृषी, सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आंबेडकरी अनुयायांना संविधान अमृत महोत्सव व राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६ या राज्यस्तरीय पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी नाशिक येथील कर्मवीर दादासाहेब गायकवाड, आमदार पी. जे. रोहम, माजी मंत्री दादासाहेब रुपवते, कोल्हापूर येथील गंगाराम कांबळे, छत्रपती संभाजी महाराजांवर अंत्यसंस्कार करणारे गोविंद गायकवाड व शूर सेनापती सिदनाक महार यांचे १४ वे वारसदार, बौध्द समाजातील पहिली महिला उद्योजिका दिवंगत पैकाबाई व बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव आंबडवे गावातील सकपाळ कुटुंब असे विविध जिल्ह्यातील इतिहास प्रसिद्ध घराण्याचे वारसदार तसेच तळेगाव दाभाडे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बंगल्यासह त्या भागातील ४१ एकर जागेसाठी न्यायालयीन लढा लढून ती जागा पुन्हा मिळवून देणारे थूल साहेब, नागपूर येथील १३ एकर जागेत ५०० हून अधिक बौद्ध भिक्खूच्या निवासस्थानाची सोय असलेले अद्ययावत बुद्ध विहार तसेच भिक्खू विश्रामगृह निर्माण करणाऱ्या कमिटीतील संजय पाटील तसेच कोरेगांव भीमा येथील जयस्तंभसह तेथील अनेक एकर जागेच्या अतिक्रमणाविरुद्ध न्यायालयीन लढाई लढत असलेले दादाभाऊ अभंग, अकोला येथील प्रा. मुकुंद भारसाकळे, ज्येष्ठ साहित्यिक विजय सुरवाडे, सिने अभिनेते भीमसेन चव्हाण, प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक सुदाम वाघमारे व बाबासाहेबांसंबंधातील विविध विषयांवर संशोधन केलेल्या विविध विद्यापीठातील प्रोफेसरांचा समावेश आहे.

# वेदांत वाईन्स...

पान १ वरून - नगरपरिषद अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच नियमांचे सातत्याने उल्लंघन झाल्यास परवाना रद्द करण्याच्या प्रक्रियेचाही विचार केला जाऊ शकतो, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. यासोबतच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे किंवा वाहतूक व्यवस्थेला अडथळा निर्माण करणाऱ्या प्रकारांची पुनरावृत्ती झाल्यास संबंधितांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल, असेही नगरपरिषदेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.


## बहुउद्देशीय ग्रामीण शिक्षण प्रसारक व सांस्कृतिक संस्था

**पिंपरणे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर ४२२६०५**

**पाहिजेत**

**आमच्या संस्थेत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता खालील प्रमाणे पद भरणे आहे.**

| अ.न. | पदनाम | जागा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | माहिती तंत्रज्ञान विषय (IT) शिक्षक (विज्ञान) | १ | MCA (Sci.)/MCB/ M.Sc (Computer) BE (Computer)/BE (IT) |

सदरचे पद तात्पुरत्या स्वरूपातील असून मानधन तत्वावरील आहेत उमेदवारांनी आपला संपूर्ण अर्ज शैक्षणिक, व्यावसायिक व अनुभव प्रमाणपत्राच्या प्रतीसह मुलाखतीसाठी प्रत्यक्ष संस्था कार्यालयात **दि. १० जून २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता** उपस्थित राहवे.

मुलाखत ठिकाण - **प.पू.गगनगिरी महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पिंपरणे** ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

**सेक्रेटरी** **चेअरमन**

**पाहिजेत**

**श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर श्री गणेश टायर्स या फॉर्मसाठी**

सेल्समन -3

सुपर कॅरी ड्रायव्हर - 1

कामाचा अनुभव आवश्यक

9423793758

**नावात बदल**

माझे नाव लग्नाआधी शाळा सोडल्याच्या दाखल्यावर **पार्वती राजाराम मंडलिक** असे होते. लग्नानंतर सर्व कागदपत्रावर **प्रमिला रामनाथ अभंग** असे आहे. तर या दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे.

**प्रमिला रामनाथ अभंग**

रा. संगमनेर, जि. अहिल्यानगर

**भाड्याने देणे आहे**

**संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी**

**२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे**

- पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन
- वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
- थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध
- व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा

**पत्ता :** नाशिक - पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

- संपर्क - 9822258458

**पाहिजेत**

**आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.**

हेल्पर - ०२

ड्रायव्हर - ०१

सेल्समन - ०१

संपर्क- नेहरु चौक, संगमनेर

9922113534

9730468090

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME

NUMAN IRFAN PATHAN

NEW NAME AS

NUMAN IRFANKHAN PATHAN

ADD - JORVE ROAD, ABDULLA MASJID, SANGAMNER TAL - SANGAMNER, DIST- AHMEDNAGAR

**पाहिजेत**

**मे. संदीप महाले ज्वेलर्ससाठी**

**दागिन्यांच्या बिलिंगसाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत**

- संपर्क- मे. संदीप बबन महाले ज्वेलर्स बाजारपेठ, संगमनेर, जि. अ.नगर

8698305864

**पाहिजेत**

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस

सिक्युरिटी गार्ड - ५

महिला - ३

सफाई कर्मचारी - ५

हेल्पर - ५

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर

7709828846

**पाहिजेत**

**होलसेल मेडीकल दुकान कामासाठी मुले पाहिजेत**

इंग्रजीचे ज्ञान आवश्यक

आकर्षक पगार

संपर्क- ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

9730042410

**कामगार भरती**

अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)

स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक

सेल्समन- ०५ (पुरूष)

अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक

वॉचमन- ०१

ठिकाण - रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर

9028342110

9262625962

३/६-१२/६

**जागा भाड्याने देणे**

**३ मजली ८०० स्क्वेफूट**

ठिकाण - मोमीनपुरा चौक, फेमस शुज समोर, संगमनेर

9028342110

३/६-१२/६

**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)

पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल

रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक

ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)

**माधवबाग क्लिनिक**

९३२५०२८६८६






# आता रस्त्यांचा कायापालट होणार

## राज्य मंत्रिमंडळाने घेतले धडाधड मोठे निर्णय



मुंबई (वृत्तसंस्था)

मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अत्यंत मोठे आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. शेतकरी कर्जमाफीला मान्यता देण्यात आली आहे. पण त्यासोबतच ३ महत्त्वाचे अन् धडाकेबाज निर्णय घेण्यात आले आहेत. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यासाठी आंतरराष्ट्रीय बँकेकडून कोट्यवधींच्या कर्ज प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील रस्त्यांच्या जाळ्याचा कायापालट करण्यासाठी दोन मोठ्या बँकांकडून तब्बल १७,४०० कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य मिळणार आहे. दुसरीकडे, मुंबईतील शिक्षण क्षेत्रात मोठा बदल करत हैद्राबाद नॅशनल कॉलेजिएट विद्यापीठात ६ नामांकित महाविद्यालयांचा समावेश करण्याचा ऐतिहासिक निर्णयही सरकारने घेतला आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ मधील कामांसाठी आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेच्या ५०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स कर्जास तसेच राज्य निधीच्या प्रस्तावास मान्यता.

• रस्त्यांच्या सुधारणेसाठी आशियाई पायाभूत गुंतवणूक बँके व न्यू डेव्हलपमेंट बँककडून अर्थसहाय. महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्पाला दोन्ही बँकाकडून मिळणार प्रत्येकी ८ हजार ७०० कोटी रुपयांचे अर्थसहाय्य. राज्यातील रस्ते सुधारणा व विकासाला आणखी गती मिळणार. हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट विद्यापीठ, मुंबई या समूह विद्यापीठामध्ये सहा महाविद्यालयांचा समावेश करण्यास मंत्रिमंडळाची मान्यता. यामध्ये प्राचार्य के. एम. कुंदनानी औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, मुंबई. किशनचंद चेलाराम विधि महाविद्यालय, मुंबई. श्रीमती मिठीबाई मोतीराम कुंदनानी वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई. ऋषी दयाराम आणि सेठ हसराम नॅशनल आणि सेठ वासियामुल्ल असोमुल्ल विज्ञान महाविद्यालय, मुंबई व थडोमल शाहनी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई यांचा घटक महाविद्यालये म्हणून समावेश होणार.

# मोठ्या अतिक्रमणांकडे दुर्लक्ष; भाजीविक्रेत्यांवर कारवाईचा बडगा

## नगरपालिकेच्या कारवाईवर युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख यांची टीका

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगरपालिकेने शहरातील मोठ्या अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्याऐवजी हातावर पोट भरणाऱ्या गोरगरीब भाजीविक्रेते, फेरीवाले आणि छोट्या व्यावसायिकांवर कारवाई केल्याचा आरोप युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख यांनी केला आहे. या कारवाईमुळे अनेक कुटुंबांचा रोजगार हिरावला गेला असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याची टीका त्यांनी केली.

देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील अनेक ठिकाणी मोठ्या व्यावसायिकांनी सार्वजनिक जागांवर अतिक्रमणे केली आहेत. दिल्ली नाका, तीनबत्ती चौक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसर तसेच पुणे-नाशिक महामार्गालगत अनेक ठिकाणी नियमबाह्य बांधकामे करून अतिक्रमणे करण्यात आल्याचे



> ### संगमनेरमधील भाजी विक्रेते आणि फेरीवाल्यांना मिळाली हक्काची जागा!
>
> **संगमनेर नगर परिषद हद्दीतील एकाही लहान-मोठ्या फेरीवाल्याला किंवा दुकानदाराला रस्त्यावर न सोडता, प्रशासनाने प्रत्येकाची अत्यंत उत्तम सोय करून हक्काची जागा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही चुकीच्या अफवांना बळी न पडता आपल्या नगरपालिकेवर आणि प्रशासनावर पूर्ण विश्वास ठेवावा. शहराच्या सुंदरतेसाठी, शिस्तीसाठी आणि वाहतूक कोंडीमुक्त संगनेरसाठी प्रशासनाला मोलाचे सहकार्य करत राहा!**
>
> **मुख्याधिकारी**
> **संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

सर्वश्रुत आहे. मात्र, अशा मोठ्या अतिक्रमणांवर कारवाई करण्याचे धाडस न दाखविता नगरपालिका प्रशासनाने गोरगरीब भाजीविक्रेते, फेरीवाले आणि छोट्या व्यावसायिकांवर कारवाईचा बडगा उगारल्याचा आरोप त्यांनी केला.

नगरपालिकेच्या या मोहिमेमुळे रोजंदारीवर व्यवसाय करणाऱ्या अनेक कुटुंबांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. दिवसाची कमाई करून संसार चालविणाऱ्या भाजीविक्रेत्यांचे स्टॉल, हातगाड्या आणि व्यवसाय हटविण्यात आल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कारवाई करताना प्रशासनाने मानवी दृष्टिकोन ठेवणे आवश्यक होते, असेही देशमुख यांनी नमूद केले. अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविताना प्रशासनाने सर्वांसाठी समान निकष लागू करावेत. मोठे असो वा छोटे, कायद्यापुढे सर्व समान असले पाहिजेत. केवळ गरीबांवर कारवाई करून मोठ्या अतिक्रमणधारकांना अभय देण्याचा प्रकार अन्यायकारक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

गोरगरीब विक्रेत्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून देत त्यांच्या रोजगाराचे संरक्षण करावे, तसेच शहरातील सर्व प्रकारच्या अतिक्रमणांवर निष्पक्ष आणि समान कारवाई करावी, अशी मागणी सौरभ देशमुख यांनी केली आहे.

> ### गरीबांवर अन्याय सहन करणार नाही
>
> **गोरगरीब भाजीविक्रेते, फेरीवाले आणि छोटे व्यवसाय करणाऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात युवा सेना संघर्ष करेल. विक्रेत्यांना पर्यायी जागा देऊन त्यांचा रोजगार सुरक्षित करावा आणि अतिक्रमण हटविताना सर्वांना समान न्याय द्यावा, अशी ठाम भूमिका युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख यांनी मांडली आहे.**

नगरपालिकेने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास आमदार अमोल खताळ यांच्या नेतृत्वाखाली युवा सेना सर्व भाजीविक्रेते, फेरीवाले आणि छोटे व्यवसाय करणाऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# राज्यातील धरणांमध्ये 27.79 टक्के उपयुक्त पाणीसाठा; गतवर्षीपेक्षा 32 टीएमसीने घट

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यातील लहान, मध्यम आणि मोठ्या अशा एकूण ३,०२८ धरणांमध्ये १ जून २०२६ रोजी ४००.८३८ टीएमसी म्हणजेच २७.७९ टक्के उपयुक्त (लाईव्ह) पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती जलसंपत्ती अभ्यासक व जलसिंचन तज्ज्ञ इंजि. हरिश्चंद्र चकोर यांनी दिली. गतवर्षी याच दिवशी राज्यातील धरणांमध्ये ४३३.२९२ टीएमसी (३०.०४ टक्के) पाणीसाठा उपलब्ध होता. त्यामुळे यंदा सुमारे ३२.४५३ टीएमसी इतकी घट नोंदविण्यात आली आहे.



अल-निनोचा प्रभाव, वाढते तापमान आणि कमी झालेला पाऊस यामुळे यंदाचा पाणीसाठा चिंतेचा विषय ठरत असल्याचे चकोर यांनी सांगितले. राज्यातील सहा महसुली विभागांपैकी अमरावती विभागात सर्वाधिक ४०.८३ टक्के तर नागपूर विभागात ३८.३६ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. याउलट पुणे विभागात केवळ १८.१२ टक्के पाणीसाठा असून तो राज्यातील सर्वात कमी आहे.

विभागनिहाय पाणीसाठा -

कोकण : ४४.११७ टीएमसी (३३.७२%), नाशिक : ६०.५०६ टीएमसी (२८.७७%), पुणे : ९७.६०१ टीएमसी (१८.१२%), छत्रपती संभाजीनगर (मराठवाडा) : ७८.०७२ टीएमसी (३०.३४%)

अमरावती : ५६.६१५ टीएमसी (४०.८३%), नागपूर : ६३.९२५ टीएमसी (३८.३६%)

प्रमुख धरणांची स्थिती -

राज्यातील मोठ्या धरणांमध्ये उजनी धरणात उणे ११.४८ टीएमसी (उणे २१.४३ टक्के), कोयना धरणात १०.७५ टीएमसी (१०.७४ टक्के) तर जायकवाडी धरणात २५.१७१ टीएमसी (३२.८३ टक्के) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. मराठवाड्यासाठी जीवनदायी मानल्या जाणाऱ्या जायकवाडी धरणात दररोज सुमारे ८० दशलक्ष घनफूट पाण्याचे बाष्पीभवन होत असून महिन्याला जवळपास २.५ टीएमसी पाण्याचा व्यय होत असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. गेल्या वर्षभरात धरणातील सुमारे १२.३४७ टीएमसी पाणी केवळ बाष्पीभवनामुळे कमी झाल्याचे चकोर यांनी स्पष्ट केले.

> ### अहिल्यानगर जिल्ह्यातील धरणांची स्थिती चिंताजनक
>
> **अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख १३ प्रकल्पांमध्ये एकूण सुमारे १६.०९१ टीएमसी पाणीसाठा असून तो गतवर्षीपेक्षा सुमारे ४.५० टीएमसीने कमी आहे. भंडारदरा धरणात २५.२७ टक्के, निळवंडे धरणात २८.७५ टक्के, मुळा धरणात २२.९८ टक्के, आढळा धरणात ४२.८३ टक्के, सीना धरणात ३६.१३ टक्के, घोड धरणात २०.५२ टक्के तर भोजापूर प्रकल्पात केवळ १.६६ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.**

उन्हाळी हंगाम सुरू असताना उपलब्ध पाणीसाठ्यामुळे सध्या पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या नसली तरी वाढते तापमान आणि मान्सूनपूर्व पावसाचा विलंब लक्षात घेता ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंतच्या कालावधीसाठी पाणी नियोजन आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी पिण्याच्या पाण्याचे आरक्षण सुनिश्चित करण्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक निर्देश दिले आहेत. ग्रामीण भागातील काही पाणीपुरवठा योजनांचे जलस्रोत आटल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असून शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे.

यंदा महाराष्ट्रात जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मान्सून सक्रिय होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. मात्र गतवर्षी मे महिन्याच्या सुरुवातीलाच पाऊस सुरू झाल्याने धरणांमध्ये पाण्याची आवक झाली होती. यंदा मात्र पावसाने अद्याप हजेरी लावलेली नसल्याने शेतकरी वर्गात चिंता व्यक्त केली जात आहे. सन २०१५-१६ मधील तीव्र पाणीटंचाईचा अनुभव लक्षात घेऊन प्रशासनाने यंदा आवश्यक ती पूर्वतयारी सुरू केल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

# १६ वर्षांच्या सेवेला पदोन्नतीची पावती

## कर्तव्यनिष्ठ पोलीस अनिल शेंगाळे यांचा गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कर्तव्यनिष्ठा, अचूक कार्यपद्धती आणि पोलीस दलाप्रती असलेल्या सातत्यपूर्ण समर्पणाच्या जोरावर अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलात तब्बल १६ वर्षे उल्लेखनीय सेवा बजावणारे धडाडीचे पोलीस अंमलदार अनिल शेंगाळे यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची मोठी पावती मिळाली आहे. जिल्हा पोलीस दलात 'पोलीस नाईक' म्हणून कार्यरत असणाऱ्या शेंगाळे यांना 'पोलीस हवालदार' पदावर मानाची पदोन्नती (प्रमोशन) देण्यात आली आहे. या पदोन्नतीमुळे त्यांच्यावर सर्वच स्तरांतून कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



शिक्षणाचा दर्जा अन् पुणे ते अहिल्यानगर प्रवास- मूळचे जुन्नर (जिल्हा पुणे) तालुक्यातील नळवणे गावचे रहिवासी असलेले आणि सध्या राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथे स्थायिक असलेले अनिल शेंगाळे हे उच्चशिक्षित आहेत. त्यांनी बी.ए. पर्यंतचे उच्च शिक्षण पूर्ण केले आहे. शिक्षणाची उत्तम पार्श्वभूमी आणि खाकी वर्दीची असलेली आवड यांमुळे त्यांनी नगर जिल्हा पोलीस दलात भरती होऊन आपल्या पोलीस सेवेचा यशस्वी प्रवास सुरू केला.

१३ वर्षे गोपनीय विभागात मोलाचे योगदान- आपल्या १६ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत अनिल शेंगाळे यांनी अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या गोपनीय विभागात सलग १३ वर्षे सेवा बजावली. गुन्हेगारीला वेसण घालणे, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी गुप्त माहितीचे जाळे विणणे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना अचूक इनपुट देणे यात त्यांनी नेहमीच मोलाची भूमिका बजावली.

त्यांनी आपल्या सेवाकाळात जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवला आहे. यामध्ये: अकोले पोलीस स्टेशन, आश्वी पोलीस स्टेशन, श्रीरामपूर ग्रामीण पोलीस स्टेशन या ठिकाणी त्यांनी अत्यंत चोखपणे कर्तव्य पार पाडले. सध्या ते अपर पोलीस अधीक्षक कार्यालय, श्रीरामपूर येथे अत्यंत महत्त्वाच्या जबाबदारीवर कार्यरत आहेत.

वरिष्ठ अधिकारी अन् सहकारी मित्रांच्या उपस्थितीत सत्कार- त्यांच्या या गौरवपूर्ण पदोन्नतीबद्दल श्रीरामपूर विभागाचे अपर पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ वाकचौरे, पोलीस उपनिरीक्षक (झडख) श्री. चारुदत्त धोंडे, तसेच आप्पासाहेब खंडाळ आणि राजेंद्र गोडगे आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अनिल शेंगाळे यांचे विशेष कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या आनंदोत्सवाप्रसंगी त्यांचे सहकारी व स्नेही पोलीस हवालदार रविंद्र चव्हाण, पोलीस हवालदार रामेश्वर ढोकणे, पोलीस हवालदार सचिन धनाड, तसेच रामेश्वर वेताळ, काका मोरे, संदिप दरंदले, किशोर हिंगे, संभाजी वरे, सचिन शेळके आणि सतिष पठारे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी शेंगाळे यांना पुष्पगुच्छ देऊन भावी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

एक संयमी, अभ्यासू आणि खाकी वर्दीची शान वाढवणारा पोलीस अंमलदार अशी ओळख असलेल्या श्री. अनिल शेंगाळे यांच्या पदोन्नतीमुळे राहुरी, श्रीरामपूर, आश्वी आणि अकोले परिसरातील नागरिक तसेच पोलीस वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे.

# अमेरिका-इराण संघर्ष : भारताच्या खिशावर किती भार?

मध्य पूर्व हा जगातील सर्वात संवेदनशील आणि धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा प्रदेश मानला जातो. जगातील मोठ्या प्रमाणातील तेलसाठे या प्रदेशात असल्यामुळे येथे निर्माण होणाऱ्या कोणत्याही तणावाचा परिणाम संपूर्ण जगावर होतो. अमेरिका आणि इराण यांच्यातील संबंध अनेक दशकांपासून तणावपूर्ण राहिले आहेत. जर या दोन देशांमध्ये प्रत्यक्ष युद्ध किंवा मोठ्या प्रमाणावर लष्करी संघर्ष उद्भवला, तर त्याचे परिणाम केवळ मध्य पूर्वेपुरते मर्यादित राहणार नाहीत, तर जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा बाजारपेठ, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि भारतासारख्या विकसनशील देशांवरही त्याचे गंभीर परिणाम दिसून येतील.

इराण हा जगातील प्रमुख तेल उत्पादक देशांपैकी एक आहे. तसेच पर्शियन गल्फ आणि होर्मूझ सामुद्रधुनी या जागतिक तेलवाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मार्गांवर त्याचा प्रभाव आहे. जगातील सुमारे एक-पंचमांश तेलपुरवठा या मार्गातून होतो. युद्धाच्या परिस्थितीत या भागातील तेलपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता असते. त्यामुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमती झपाट्याने वाढू शकतात. भारत हा आपल्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात करणारा देश आहे. त्यामुळे तेलाच्या किमतीतील वाढीचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. तेल महाग झाल्यास पेट्रोल, डिझेल, एलपीजी, विमान इंधन आणि वाहतुकीचा खर्च वाढतो. परिणामी वस्तू आणि सेवांच्या किंमती वाढतात. महागाईचा दर वाढल्याने सामान्य नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त भार पडतो. जीवनावश्यक वस्तूंपासून उद्योगधंद्यांपर्यंत सर्व क्षेत्रांमध्ये खर्च वाढतो.




भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने आयात बिल वाढणे ही आणखी एक गंभीर समस्या आहे. तेलाच्या वाढलेल्या किमतीमुळे भारताला अधिक परकीय चलन खर्च करावे लागते. त्यामुळे व्यापार तूट वाढते आणि चालू खात्यातील तूट अधिक गंभीर होऊ शकते. याचा परिणाम भारतीय रुपयावर होऊन रुपयाचे मूल्य डॉलरच्या तुलनेत घसरू शकते. रुपया कमकुवत झाल्यास आयात आणखी महाग होते आणि आर्थिक दबाव वाढतो. शेअर बाजारावरही अशा संघर्षाचा तात्काळ परिणाम दिसून येतो. युद्धामुळे जागतिक गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीकडे वळतात. त्यामुळे भारतासह अनेक उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमधून परकीय गुंतवणूक बाहेर जाऊ शकते. यामुळे शेअर बाजारात घसरण होऊ शकते. बँकिंग, विमान वाहतूक, वाहन उद्योग, रसायन उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रातील कंपन्यांवर त्याचा विशेष परिणाम होण्याची शक्यता असते.

भारतातील लाखो नागरिक मध्य पूर्वेतील विविध देशांमध्ये रोजगारासाठी कार्यरत आहेत. अमेरिका-इराण युद्धामुळे या प्रदेशातील सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्यास भारतीय कामगार आणि व्यावसायिकांच्या सुरक्षिततेबाबत चिंता वाढू शकते. काही परिस्थितींमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतर किंवा परतावा मोहिमा राबवाव्या लागू शकतात. याचा परिणाम परदेशातून भारतात येणाऱ्या रेमिटन्सवरही होऊ शकतो.

जागतिक स्तरावर पाहिले तर अमेरिका-इराण युद्धामुळे ऊर्जा बाजारपेठेत मोठी अस्थिरता निर्माण होईल. तेल आणि नैसर्गिक वायूच्या किमती वाढल्याने जगभरात महागाई वाढण्याची शक्यता आहे. युरोप, आशिया आणि आफ्रिकेतील अनेक देश ऊर्जा आयातीवर अवलंबून असल्यामुळे त्यांच्यावरही आर्थिक ताण वाढेल. जागतिक व्यापार मंदावू शकतो आणि आर्थिक वाढीचा वेग कमी होऊ शकतो.

युद्धामुळे समुद्री व्यापारालाही मोठा फटका बसू शकतो. होर्मूझ सामुद्रधुनीत तणाव निर्माण झाल्यास तेलवाहू जहाजे आणि व्यापारी जहाजांच्या विमा खर्चात वाढ होईल. वाहतूक खर्च वाढल्याने जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम होईल. कोविड-१९ नंतर सावरण्याचा प्रयत्न करणाऱ्या जागतिक अर्थव्यवस्थेसाठी हा आणखी एक धक्का ठरू शकतो. राजकीयदृष्ट्याही या संघर्षाचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. अमेरिका, इस्रायल आणि त्यांच्या सहयोगी राष्ट्रांची भूमिका एका बाजूला, तर इराणला पाठिंबा देणाऱ्या काही देशांची भूमिका दुसऱ्या बाजूला राहू शकते. त्यामुळे जागतिक राजकारणात नवीन गटबाजी निर्माण होण्याची शक्यता आहे. संयुक्त राष्ट्रसंघासह विविध आंतरराष्ट्रीय संस्थांवर संघर्ष रोखण्यासाठी दबाव वाढेल.

भारतासाठी ही परिस्थिती अत्यंत संवेदनशील ठरू शकते. भारताचे अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांशी महत्त्वाचे संबंध आहेत. अमेरिकेसोबत भारताचे संरक्षण, व्यापार आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील संबंध मजबूत आहेत, तर इराण हा ऊर्जा आणि प्रादेशिक धोरणांच्या दृष्टीने महत्त्वाचा भागीदार राहिला आहे. त्यामुळे भारताला संतुलित आणि सावध परराष्ट्र धोरण अवलंबावे लागेल. युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताने ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण, अक्षय ऊर्जेचा वापर, धोरणात्मक तेलसाठ्यांची वाढ आणि आयात अवलंबित्व कमी करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी महागाई नियंत्रण, चलन व्यवस्थापन आणि गुंतवणूकदारांचा विश्वास टिकवून ठेवण्यावर भर द्यावा लागेल. एकंदरीत, अमेरिका-इराण युद्ध हे केवळ दोन देशांमधील संघर्ष न राहता जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा सुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय राजकारणावर परिणाम करणारी घटना ठरू शकते. भारतासारख्या मोठ्या ऊर्जा आयातदार देशासाठी याचे आर्थिक परिणाम विशेषतः गंभीर असू शकतात. त्यामुळे शांतता, संवाद आणि राजनैतिक मार्गाने मतभेद सोडवणे हेच जगाच्या हिताचे आहे. जागतिक स्थैर्य, आर्थिक प्रगती आणि मानवतेच्या कल्याणासाठी युद्ध नव्हे, तर सहकार्य आणि संवाद हाच सर्वोत्तम मार्ग आहे.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
ताम्हाणे हॉस्पिटल
अधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
आजचा संपर्क करा- 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



भंडारी
विवाह
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर साडीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# रोटरी क्लबच्या जयपूर फूट वितरण उपक्रमातून दिव्यांग बनणार स्वावलंबी

## ११४ दिव्यांगांना ११८ साहित्याचे वाटप, रोटरीचे कार्य सेवाभावी - मालपाणी



युवावार्ता (प्रतिनिधी) :

संगमनेर - रोटरी क्लब ऑफ संगमनेर, रत्ननिधी फाऊंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच रियांश मल्टिट्रेड लिमिटेड यांच्या सहकार्याने दिव्यांग बांधव-भगिनींसाठी जयपूर फूट, कृत्रिम हात तसेच अत्याधुनिक LN-4 प्रोस्थेटिक हातांचे विनामूल्य वितरण शनिवारी (दि. ३० मे) दर्शन रोटरी आय केअर हॉस्पिटल, संगमनेर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

दिव्यांग बांधवांना कृत्रिम अवयवांच्या माध्यमातून स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला लाभार्थी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी संगमनेर नगरपालिकेच्या नगरसेविका सौ. रचना मालपाणी, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे सहाय्यक प्रांतपाल रो. अमोल वैद्य, काजळे ज्वेलर्सचे संचालक राजेंद्र काजळे, रत्ननिधी फाऊंडेशनचे मनोज चव्हाण, दर्शन रोटरी आय केअरच्या डॉ. तोडकडी मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच रोटरी क्लब ऑफ संगमनेरचे अध्यक्ष रो. विश्वनाथ मालानी, सचिव रो. सौरभ म्हाळस, उपाध्यक्ष रो. महेश वाकचौरे, प्रकल्प समन्वयक रो. अजित काकडे, प्रकल्प प्रमुख रो. आनंद हासे, रो. महेश ढोले, रो. डॉ. प्रमोद राजुस्कर, रो. डॉ. सुजय कानवडे, रो. डॉ. किशोर पोखरकर, रो. राजेंद्र खोसे, रो. दिपक मणियार यांच्यासह अनेक रोटेरियन उपस्थित होते. दर्शन रोटरी आय केअर हॉस्पिटलचे व्यवस्थापक अंकुश आहेर, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, रत्ननिधी फाऊंडेशनची टीम तसेच दिव्यांग लाभार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमात लाभार्थ्यांना जयपूर फूट, कृत्रिम हात आणि LN-4 प्रोस्थेटिक हातांचे वितरण करण्यात आले. या आधुनिक कृत्रिम अवयवांमुळे अनेक दिव्यांगांना दैनंदिन जीवनातील कामे अधिक सुलभपणे करता येणार असून त्यांच्या स्वावलंबनाला नवी बळकटी मिळणार आहे.

यावेळी बोलताना नगरसेविका सौ. रचना मालपाणी यांनी रत्ननिधी फाऊंडेशन, रोटरी क्लब ऑफ संगमनेर आणि सहकार्य करणाऱ्या सर्व संस्थांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले. आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रात यापुढेही अशाच लोकहितवादी प्रकल्पांची अंमलबजावणी करून समाजातील गरजू घटकांपर्यंत सेवा पोहोचविण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. उद्योजक राजेंद्र काजळे यांनी या प्रकल्पाला शुभेच्छा व्यक्त केल्या.

या सामाजिक उपक्रमामुळे अनेक दिव्यांग बांधवांच्या जीवनात नवसंजीवनी मिळाली असून त्यांच्या स्वावलंबी आणि सन्मानपूर्वक जीवनाच्या प्रवासाला नवी दिशा मिळाली आहे. रोटरी क्लब ऑफ संगमनेर, रत्ननिधी फाऊंडेशन आणि रियांश मल्टिट्रेड लिमिटेड यांच्या या सेवाभावी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मांडवे बुद्रुक येथे महिलेचा मृतदेह विहिरीत आढळला

## आत्महत्या की घातपात ?

युवावार्ता (प्रतिनिधी)

साकूर - संगमनेर तालुक्यातील मांडवे बुद्रुक येथील डोलनर वस्तीवरील एका विहिरीत विवाहित महिलेचा मृतदेह आढळून आल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. २ जून) सायंकाळी सुमारे ६ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. अज्ञात महिलेचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली असून, ही आत्महत्या आहे की घातपात याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही.



मिळालेल्या माहितीनुसार, मांडवे बुद्रुक शिवारातील डोलनर वस्तीवर भिका डोलनर यांच्या शेतातील विहिरीत एका महिलेचा मृतदेह असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आले. ही माहिती परिसरात पसरताच मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी घटनास्थळी गर्दी केली.

घटनेची माहिती मिळताच घारगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत थोरात यांच्यासह पोलिस कर्मचारी प्रमोद गाडेकर, सुभाष बोडखे, महादेव हांडे, सुरेश शेळके आणि चंद्रकांत मेढे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांच्या मदतीने बाजाच्या साहाय्याने संबंधित महिलेचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आला. पोलिसांनी घटनास्थळी महिलेची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला. मात्र, ती महिला स्थानिक परिसरातील नसल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी संगमनेर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. सदर महिला विहिरीत कशी पडली, तिने आत्महत्या केली की तिचा घातपात झाला, याबाबत विविध तर्क-वितर्क व्यक्त केले जात आहेत. पोलिसांच्या प्राथमिक अंदाजानुसार, संबंधित महिला सुमारे २० तासांपूर्वी विहिरीत पडली असावी.

दरम्यान, या महिलेची ओळख पटविण्याचे काम सुरू असून, संबंधित महिलेला कोणी ओळखत असल्यास त्यांनी घारगाव पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत थोरात यांनी केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास घारगाव पोलिस करत आहेत.

# भाजी विक्रेत्यांचे बळजबरीचे स्थलांतर थांबवा

## नगरसेविका साक्षी सूर्यवंशी यांचे निवेदन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पेटीट हायस्कूल परिसरातील भाजी विक्रेत्यांचे बळजबरीने करण्यात येणारे स्थलांतर तातडीने थांबवावे, अशी मागणी शिवसेना नगरसेविका सौ. साक्षी सूर्यवंशी यांनी मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नगरपालिकेने भाजी विक्रेत्यांसाठी मेडिकव्हर हॉस्पिटलसमोर पर्यायी जागा उपलब्ध करून दिली असली, तरी तेथील दुर्गंधी, ॲम्ब्युलन्सची वर्दळ, शौचालय व पार्किंग सुविधांचा अभाव, तसेच महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही व हायमास्ट दिव्यांची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पर्यायी जागा अपुरी असून पावसाळ्यात चिखल व पाणी साचण्याची समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे आवश्यक सुविधा उपलब्ध करून व विक्रेत्यांशी चर्चा करून समाधानकारक तोडगा निघेपर्यंत त्यांना सध्याच्या ठिकाणी व्यवसाय करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच नगरपालिकेची कारवाई नियमानुसार झाली का, सर्वांना समान न्याय मिळाला का याची चौकशी करून पुढील कोणतीही एकतर्फी कारवाई टाळावी, अशी विनंतीही निवेदनातून करण्यात आली आहे.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
कर्ज रक्कम वाढ | कर्ज व्याजदर कमी | कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
ICU INTENSIVE CARE UNIT
बदलत्या काळात अत्याधुनिक सुविधांनी युक्त अतिदक्षता विभाग
24 HOUR SERVICE
सर्व प्रकारच्या कॅशलेस कंपनी सुविधा उपलब्ध
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

दर्शन टेक्स्टाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय रोग परिशमनाय
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25